महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) वर्ष : दुसरे अंक : २७६ वा दिनांक : ०३/०९/२०२५ वार : बुधवार

## आज संपूर्ण महाराष्ट्रासाठी सोन्याचा दिवस - मनोज जरांगे



**मुंबई :** संपूर्ण महाराष्ट्रासाठी विशेषतः मराठवाड्यासाठी आज सोन्याचा दिवस आहे. माझ्या समाजाचे कल्याण झाले. हा माझ्या समाजासाठी सुवर्णक्षण असून आज दिवाळी साजरी करा, अशा शब्दात मनोज जरांगे यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत. मराठा आरक्षणासाठीचा शासन निर्णय आल्यानंतर मनोज जरांगे यांनी उपोषण मागे घेतले. तसेच यावेळी मनोज जरांगे भावुक झाल्याचे पाहायला मिळाले.

मराठा उपसमितीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे पाटलांनी आधी मसुदा दिला व त्यानंतर एक तासात जीआर देखील आला. यावेळी मनोज जरांगे यांनी व्यवस्थित पडताळून जीआर वाचले. तसेच वकिलांच्या मार्फत सुद्धा सगळे जीआर व्यवस्थित तपासून घेतले. तसेच मागच्या ७५ वर्षात विजय झाला नसेल असा विजय मराठ्यांचा झाला आहे, असे जरांगे यांनी म्हटले. यावेळी मराठा बांधवांनी 'पाटील.. पाटील' अशा घोषणाबाजी देखील केल्या.

मनोज जरांगे यांनी उपोषण सोडल्यानंतर मराठा बांधवांनी गुलाल उधळत आनंदोत्सव साजरा केला. जरांगे यांनी यावेळी मराठा आंदोलकांना आपापल्या गावी सांभाळून जा, असे निर्देश दिले. मनोज जरांगे यांना आता रुग्णालयात नेण्यात येणार असून ५ दिवसांच्या उपोषणामुळे त्यांची प्रकृती खराब झाली असून उपचार सुरू करण्यात येणार आहेत.

दरम्यान, मनोज जरांगे यांनी मुंबईच्या आझाद मैदानावरील उपोषण संपल्याची घोषणा केली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातील महायुती सरकारने त्यांच्या जवळपास सर्वच मागण्या मान्य केल्या आहेत. त्यासंबंधीचे जीआरही सरकारने काढले आहे. त्यामुळे जरांगेंनी मराठा आरक्षण उपसमितीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हातून लिंबू सरबत घेऊन आपले उपोषण सोडले. यामुळे गत शुक्रवारपासून सुरू असलेल्या मराठा आरक्षणाच्या आंदोलनाचा तिढा यशस्वीपणे सुटला आहे.

## तिघांनी ऐतिहासिक क्षणाचे साक्षीदार होण्याचे का टाळले? सुषमा अंधारे



**मुंबई** :मनोज जरांगे यांच्या आंदोलनाला अखेर यश मिळाले असून, पाच दिवसांपासून सुरू असलेले त्यांचे उपोषण सरकारने मागण्या मान्य केल्यानंतर संपुष्टात आले. या निर्णयामुळे मराठा समाजात समाधान आणि जल्लोषाचे वातावरण निर्माण झाले आहे. यावर ठाकरे गटाच्या नेत्या यांनी प्रतिक्रिया दिली. मराठ्यांना आरक्षण मिळणे हा ऐतिहासिक क्षण असल्याचे त्यांनी म्हटले आहे. त्यासोबतच त्यांनी मुख्यमंत्री आणि दोन्ही मुख्यमंत्र्यांवर निशाणा साधला आहे.

मुंबईतील आझाद मैदानावर मराठ्यांना ओबीसी प्रवर्गातून आरक्षण मिळावे या प्रमुख मागणीसाठी मनोज जरांगे आंदोलन करत होते. पाचव्या दिवशी शासनाने मराठवाड्यात हैदराबाद गॅझेट लागू करण्याचा जीआर जाहीर केला. त्यानंतर मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हस्ते लिंबू शरबत पिऊन जरांगे यांनी उपोषण मागे घेतले.

या घडामोडींवर ठाकरे गटाच्या नेत्या सुषमा अंधारे यांनी प्रतिक्रिया दिली. त्यांनी सोशल मीडियावर पोस्ट करत या आंदोलनाचे कौतुक केले असून, मराठा समाजाला आरक्षण मिळणे हा "ऐतिहासिक क्षण" असल्याची भावना व्यक्त केली. याचबरोबर त्यांनी सरकारमधील प्रमुख नेत्यांवर टीकाही केली. "एरवी काश्मिरातल्या पहेलगामपर्यंत जाणारे एकनाथ शिंदे, दिल्ली बिहारमध्ये येरझारा घालणारे फडणवीस, आणि कुठेही खुट्ट वाजले की हजर होणारे अजित पवार या तिघांनीही या ऐतिहासिक क्षणाचे साक्षीदार होण्यासाठी आझाद मैदानावर येण्याचे का बर टाळले असेल?" असा सवाल सुषमा अंधारे यांनी उपस्थित केला आहे.

## हैदराबाद गॅझेटमुळे ओबीसी आरक्षणाला धक्का नाही - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**मुंबई :** मनोज जरांगे यांच्या उपोषणानंतर मराठा आरक्षणासंदर्भात सरकार आणि आंदोलकांमध्ये झालेल्या यशस्वी तोडग्यानंतर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपली पहिली प्रतिक्रिया दिली. सरकारने मराठा समाजाच्या हिताचा निर्णय घेतला आहे. हैदराबाद गॅझेट लागू करण्याची सरकारची सुरुवातीपासूनची तयारी होती. पण मनोज जरांगे यांची सरसकट आरक्षणाची मागणी कायद्याच्या कसोटीवर टिकणारी नव्हती. उच्च न्यायालय आणि सर्वोच्च न्यायालयाचे निर्णय लक्षात घेता, 'सरसकट' आरक्षण देणे शक्य नाही, असे देवेंद्र फडणवीस म्हणाले.

मुंबईतील आझाद मैदानावर मराठ्यांना ओबीसी प्रवर्गातून आरक्षण मिळावे या प्रमुख मागणीसाठी मनोज जरांगे आंदोलन करत होते. पाचव्या दिवशी शासनाने मराठवाड्यात हैदराबाद गॅझेट लागू करण्याचा जीआर जाहीर केला. त्यानंतर मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हस्ते लिंबू शरबत पिऊन जरांगे यांनी उपोषण मागे घेतले. यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रतिक्रिया दिली.

एक चांगला आणि मराठा समाजाच्या हिताचा तोडगा आज मंत्रिमंडळ उपसमितीने काढला. त्यामुळे चालू असलेले उपोषण संपवण्यात आलेले आहे. हैदराबाद गॅझेट लागू करण्याकरता आमची सुरुवातीपासूनच तयारी होती. पण मनोज जरांगे यांची सरसकटची मागणीमध्ये कायदेशीर अडचणी होत्या. हायकोर्ट आणि सुप्रीम कोर्टाचे निर्णय बघता सरसकट करणे शक्य नव्हते. विशेषतः आपण या ठिकाणी लक्षात घेतले पाहिजे, या संदर्भात ही वस्तुस्थिती त्यांच्या लोकांच्याही लक्षात आणून देण्यात आली. आपल्या कायद्याप्रमाणे आणि देशाच्या संविधानाप्रमाणे आरक्षण हे समुहाला नाही, तर व्यक्तीला मिळत असते. त्या व्यक्तीने त्यासाठी दावा करायचा असतो, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले.

सरसकट करता येणार नाही, ते कायद्याच्या पातळीवर टिकणार नाही. जरांगेंच्या टीमने देखील काल ती भूमिका समजून घेतली आणि स्वीकारली. कायद्यात सरसकट बसत नसेल, तर सरसकट करू नका, असे त्यांनी काल सांगितले. त्यातून हा जो काही स्टेलमेट होता, तो मागे झाला. पुन्हा त्यासंदर्भातील चर्चा मंत्रिमंडळ उपसमितीने केल्या, त्याचा जीआर तयार झाला. त्यात जे काही बदल होते, ते आपण केले. तो जीआर देखील जारी झाला आहे. यासोबतच इतरही काही अनुशंगिक मागण्या होत्या, त्या सगळ्या मागण्या मंत्रिमंडळ उपसमितीने मान्य केल्या आहेत, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले.

आता ओबीसी समाजामध्ये भीती होती, सरसगट आरक्षण घेतील आणि इतर समाजही घुसण्याचा प्रयत्न करणार असे वाटत होते. आता तसे होणार नाही. आता ज्यांचा दावा आहे, त्यांना आरक्षणाचा लाभ मराठा समाजाला मिळेल आहे. हा प्रश्न सगळ्यात मराठवाड्यात महत्त्वाचा होता तिथे रेकॉर्डच नव्हते. पण आता संवैधानिक तोडगा आम्ही काढला आहे, आता तो कोर्टामध्येही टिकेल.

राधाकृष्ण विखे पाटील आणि उपसमितीतील सर्व प्रमुख नेत्यांचं मी आभार मानतो. त्यांनी सातत्याने बसून, अभ्यास करून हा मार्ग काढला आहे. मंत्रिमंडळ समितीच्या कामावर मी समाधानी आहे. जे मराठवाड्यात राहणारे, ज्यांच्या कुणबी नोंदी सापडल्या आहेत, रक्त-नात्यातील कुणाचाही कुणबी उल्लेख असेल तर त्याला कुणबी सर्टिफिकेट मिळणार. हैदरबाद गॅझेटच्या माध्यमातून, ज्यांना पुरावा मिळेल त्यांना आरक्षण मिळणार.

ज्याच्याकडे पुरावा नाही त्याला याचा लाभ मिळणार नाही. त्यामुळे ओबीसी आरक्षणाला कोणताही धक्का बसणार नाही असा विश्वास मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला. मराठवाड्यात रेकॉर्ड्स नाहीत. त्या ठिकाणी नोंदीचा हा प्रश्न गंभीर होता. त्यावर आम्ही संविधानिक तोडगा काढला. तो कोर्टातही टिकणार आहे असेही ते म्हणाले.

माझ्यावर टीका झाली तरी मी जराही विचलित झालो नाही, कारण समजाला न्याय द्यायचा हेच ध्येय होते. तो न्याय देताना दोन समाजात तेढ निर्माण होणार नाही, अन्यायाची भावना निर्माण होणार नाही असा कायदेशीर निर्णय करावा लागेल. मराठा असो, ओबीसी असो वा महाराष्ट्रातील कोणताही समाज असो, प्रत्येक समाजासाठी काम करणे हे माझे कर्तव्य समजतो. त्या कर्तव्यावेळी कधी शिव्या मिळतात तर कधी फुलांचे हार देखील मिळतात," असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार ०३ सप्टेंबर २०२५


## फुटबॉल स्पर्धेत बाबुराव माणिकराव पाटील विद्यालयातील 14 वर्षे मुलींचा संघ प्रथम



**कन्नड (प्रा. कृष्णा शिंदे) :** तालुकास्तरीय शालेय फुटबॉल स्पर्धेत बाबुराव माणिकराव पाटील औराळकर माध्यमिक विद्यालय कळंकीचा 14 वर्षे मुलींचा संघ प्रथमजिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय छत्रपती संभाजीनगर व तालुका क्रीडा समिती यांच्या संयुक्त विद्यमानाने तालुकास्तरीय फुटबॉल स्पर्धेत आयोजन जवाहरलाल नेहरू नवोदय विद्यालय कन्नड येथे करण्यात आले होते. स्पर्धेचे उद्घाटन नवोदय विद्यालयाचे प्राचार्य श्री भुलन सरोज सर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी तालुका क्रीडा संयोजक मुक्तानंद गोस्वामी सर,तालुका क्रीडा संकुल समिती सदस्य प्रविण शिंदे सर, अविनाश काळे सर, अजित खंबाट सर, कडुबा चव्हाण सर यांची प्रमुख उपस्थिती होती. या स्पर्धेत रोहिणी जाधव (कर्णधार ) आरती वाकळे,रुक्मण पोकळे, कार्तिकी , निकिता मंगाळ,सविता पथवे,निकिता माधव, निकिता रविंद्र,कल्याणी , दिव्या आव्हाड, सिता पथवे, योगीता मेगाळ सहभागी होत्या, संस्थेचे अध्यक्ष मार्नासंग पवार साहेब, शालेय समितीचे अध्यक्ष चंद्रकांत देशमुख, साहेब कृष्णा पाटील निकम यांनी अभिनंदन केले आहे स्पर्धा यशस्वी करण्यासाठी विशाल दांडेकर, एजाज शहा, वसीम शेख, शुभम भोजने यांनी काम पाहिले.स्पर्धेचा अंतिम निकाल पुढीलप्रमाणे 14 वर्षे मुले प्रथम क्रमांक : कृष्णा इंटरनॅशनल स्कूल कन्नड द्वितीय क्रमांक : गौताळा व्हॅली स्कूल कन्नड 14 वर्षे मुली प्रथम क्रमांक : बाबुराव माणिकराव पाटील माध्यमिक विद्यालय कळंकी 17 वर्षे मुले प्रथम क्रमांक : फातिमा कॉन्व्हेन्ट हायस्कूल कन्नड द्वितीय क्रमांक : कृष्णा इंटरनॅशनल स्कूल कन्नड तृतीय क्रमांक : गौताळा व्हॅली स्कूल कन्नड 17 वर्षे मुली प्रथम क्रमांक : फातिमा कॉन्व्हेन्ट हायस्कूल 19 वर्षे मुले प्रथम क्रमांक : अली अलाना उर्दू हायस्कूल कुंजखेडा पंच म्हणुन वसीम शाह, विशाल दांडेकर, एजाज शहा, अजित खांबट, कडुबा चव्हाण, शुभम.

## ब्रिगेडियर ए. जी. बरबरे यांच्या हस्ते वैभवी शेंडगे व सुशांत जाधव यांचा गौरव




**मुरूम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** छत्रपती संभाजी नगर चे ग्रुप कमांडर ब्रिगेडियर ए जी बरबरे यांनी भारत शिक्षण संस्था संचलित श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय उमरगा येथील एनसीसी चे कॅडेटस वैभवी शेंडगे आणि सुशांत जाधव यांचा सत्कार व अभिनंदन केले. ५३ महाराष्ट्र बटालियन एनसीसी लातूर यांच्या वतीने या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. ज्या कॅडेटसनी राष्ट्रीय, राज्यस्तरीय या ठिकाणी योगदान दिले या बदल त्यांचा प्रमाणपत्र व किट देऊन दोघांचा सत्कार या वेळी करण्यात आला . वैभवी शेंडगे हिने २६ जानेवारी २०२५ रोजी राजपथ दिल्ली येथे पार पडलेल्या प्रजासत्ताक दिनी महाराष्ट्राच्या संघातून ड्रिल परेड मध्ये तिने नेतृत्व केले होते तसेच सुशांत जाधव ने ऑल इंडिया फायरिंग, थल सैनिक कॅंप फायरिंग स्पर्धेत इंटर ग्रुप कॉंपिटिशन पर्यंत तो मराठवाडा विभागात तो प्रथम आला होता. या सत्कार प्रसंगी ५३ महा बटालियन एनसीसी लातूरचे कमान अधिकारी कर्नल संतोष नवगन, सुभेदार मेजर शंभु सिंग व सर्व आर्मी स्टाफ कार्यालयीन कर्मचारी उपस्थित होते. या बदल भारत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष अमोल भैया मोरे उपाध्यक्ष अश्लेष भैया मोरे तसेच सर्व संचालक मंडळ व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ संजय अस्वले , कॅप्टन डॉ ज्ञानेश्वर चिट्टमपल्ले यांनी भावी आयुष्यासाठी शुभेच्छा देऊन अभिनंदन केले.

## राष्ट्रामता इंदिरागांधी सैनिकी शाळेत क्रीडा दिन उत्साहात साजरा




**पडेगाव (प्रा. शिवाजी गायकवाड) :** छत्रपती संभाजी नगर,नुकत्याच २९ ऑगस्ट २०२५ रोजीच्या क्रीडा दिननिमित्त राष्ट्रमाता इंदिरा गांधी सैनिकी शाळा व कनिष्ठ महाविद्यालय, रायपूर या ठिकाणी राष्ट्रीय क्रीडा दिन पार पडला या कार्यक्रमाला माजी क्रीडा उपसंचालक श्री. जगन्नाथ अधाने, पर्यटन सहाय्यक शिवाजी गायकवाड, एन. आय. एस. प्रशिक्षक मोहम्मद रियाझुद्दीन, कमांडंट संजयजी सोनवणे, प्राचार्य श्री.निखिल राठोड सर, उपप्राचार्य डॉ.सोळंकी सर, उपमुख्याध्यापकडॉ. पडघान सर , पर्यवेक्षक बोरीकर सर ,क्रीडा प्रमुख श्री.जयभारत दूधमोगरे सर, कार्यक्रमाचे आयोजक श्री.नेटके सर, खाडे मॅडम व अन्य मान्यवरांच्या उपस्थितीत क्रीडा दिन कार्यक्रम पार पडला.


ADMISSION OPEN

10th, 12th and Graduate Students

Government Recognised

Job Guarantee Courses

DMLT | P.G.DMLT

X-RAY | C.T.-SCAN

E.C.G. | Radiology

Physiotherapy | Optometry

O. T. TECHNICIAN

PG Radiology

Contact: 9405109103 8830838903

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार ०३ सप्टेंबर २०२५

## महाराष्ट्रात पावसाचा जोर वाढण्याची शक्यता : मराठवाड्यासह विदर्भ व कोकणाला अलर्ट जारी



**मुंबई :** आजपासून महाराष्ट्रात पावसाचा जोर वाढण्याची शक्यता आहे. हवामान विभागाने मराठवाडा, विदर्भ, उत्तर महाराष्ट्र आणि कोकण किनारपट्टीसाठी जोरदार पावसाचा 'अलर्ट' जारी केला आहे. याशिवाय, पुणे, सातारा आणि कोल्हापूरच्या घाटमाथ्यावर पावसाचा 'येलो अलर्ट' देण्यात आला आहे.

भारतीय हवामान विभागाच्या अंदाजानुसार, बंगालच्या उपसागरात सध्या चक्रवाताची स्थिती सक्रिय आहे. पुढील २४ तासांत हे वारे वायव्य दिशेला सरकून, वायव्य बंगालच्या उपसागरावर कमी दाबाचा पट्टा तयार होण्याची शक्यता आहे. त्यामुळे, मध्य महाराष्ट्र, कोकण, गोवा किनारपट्टीसह मराठवाडा आणि विदर्भात जोरदार पाऊस पडण्याची शक्यता आहे. गेल्या महिन्यापासून महाराष्ट्रात पावसाचा जोर वाढलेला असून, सप्टेंबरच्या सुरुवातीलाही तो कायम राहणार आहे.

हवामान विभागाच्या अंदाजानुसार, समुद्राच्या तळाशी मान्सूनच्या द्रोणीय परिस्थितीमुळे कमी दाबाचा पट्टा तयार होत आहे, तर राजस्थानच्या मध्य भागात चक्राकार वाऱ्यांची स्थिती आहे. यामुळे, २ सप्टेंबरपासून बंगालच्या खाडीवरही एक नवीन कमी दाबाचा पट्टा तयार होण्याची शक्यता असून, याचा परिणाम म्हणून देशाच्या विविध भागांत जोरदार पाऊस पडेल.

येत्या सात दिवसांत गुजरातसह महाराष्ट्रातील कोकण, गोवा, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात जोरदार पावसाची शक्यता आहे. २ आणि २ सप्टेंबर रोजी कोकण, गोवा, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात मुसळधार पाऊस अपेक्षित आहे. तर ३, ४ आणि ५ सप्टेंबर रोजी कोकण, गोवा आणि मध्य महाराष्ट्रात अति मुसळधार पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

सिंधुदुर्ग रत्नागिरी रायगड तसेच पुणे सातारा कोल्हापूर घाटमाथ्यावर हवामान विभागाने ऑरेंज अलर्ट दिला आहे. विदर्भातील चंद्रपूर व गोंदिया जिल्ह्यालाही ऑरेंज अलर्ट आहे .मुंबई, ठाणे, पालघर ,नाशिक ,नगर ,पुणे, बीड, परभणी, हिंगोली, जालना, छत्रपती संभाजीनगर, संपूर्ण विदर्भात पावसाचा येलो अलर्ट देण्यात आलाय .उत्तर महाराष्ट्रात नंदुरबार, धुळे, जळगाव जिल्ह्यातही तुफान पावसाची शक्यता आहे.

## चेंगराचेंगरीतील बळींच्या स्मरणार्थ रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू स्मारक बांधणार



**बंगळुरू :** विजय समारंभात झालेल्या चेंगराचेंगरीत जीव गमावलेल्या चाहत्यांच्या स्मरणार्थ रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू (RCB) एक स्मारक बांधणार आहे. जिथे RCB च्या सर्वात उत्साही चाहत्यांची नावे, कथा आणि त्यांच्याशी संबंधित गोष्टी जतन केल्या जातील.

सोमवारी फ्रँचायझीने त्यांच्या ६ कलमी जाहीरनाम्यात ही घोषणा केली. आरसीबी केअर्स नावाच्या या उपक्रमात म्हटले आहे की- 'फ्रँचायझी आता केवळ आर्थिक मदतीपुरती मर्यादित राहणार नाही, तर पीडित कुटुंबे आणि चाहत्यांच्या स्मृती जिवंत ठेवण्यासाठी ठोस पावले उचलेल.' दोन दिवसांपूर्वी आरसीबीने अपघातात मृत्युमुखी पडलेल्यांच्या कुटुंबियांना प्रत्येकी २५ लाख रुपयांची आर्थिक मदत जाहीर केली होती.

पहिल्यांदा आयपीएल जिंकल्यानंतर, आरसीबीने ४ जून रोजी बंगळुरूमध्ये विजयी परेड आयोजित केली. या परेड दरम्यान, एम चिन्नास्वामी स्टेडियमबाहेर झालेल्या चेंगराचेंगरीत ११ जणांचा मृत्यू झाला आणि ५० हून अधिक जण जखमी झाले. जीव गमावलेले सर्व ३५ वर्षांपेक्षा कमी वयाचे होते. सर्वात लहान बळी १३ वर्षांची दिव्यंशी होती. मृत्युमुखी पडलेल्यांमध्ये तीन किशोरवयीन आणि सहा तरुण होते, ज्यांचे वय २० ते ३० वर्षांच्या दरम्यान होते.

## काँग्रेस-राजदने माझ्या आईला शिवीगाळ केली - पंतप्रधान मोदी



**पटना :** 27 ऑगस्ट रोजी बिहारमधील दरभंगा येथे राहुल गांधी यांच्या मतदार हक्क यात्रेदरम्यान पंतप्रधान मोदींच्या आईवर अत्याचार करण्यात आला. सातव्या दिवशी, पंतप्रधान मोदींनी समोर येऊन या गैरवर्तनाचे उत्तर दिले आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी मंगळवारी म्हणाले, 'काही दिवसांपूर्वी बिहारमध्ये जे घडले त्याची मी कल्पनाही केली नव्हती. बिहारमध्ये काँग्रेसच्या व्यासपीठावरून माझ्या आईला शिवीगाळ करण्यात आली. हे शिवीगाळ केवळ माझ्या आईचा अपमान नाही तर देशातील माता, बहिणी आणि मुलींचा अपमान आहे.'

पंतप्रधान म्हणाले, 'या घटनेचे दुःख माझ्या हृदयात तितकेच आहे जितके बिहारच्या लोकांच्या दुःखात आहे. मी माझे दुःख तुमच्यासोबत शेअर करत आहे, जेणेकरून मी हे दुःख सहन करू शकेन.' पंतप्रधानांनी दिल्लीहून बिहारच्या लोकांना व्हर्च्युअल पद्धतीने संबोधित करताना हे सांगितले. ते बिहार राज्य जीविका निधी शाखा सहकारी संघ लिमिटेडच्या शुभारंभ कार्यक्रमाशी जोडले गेले होते.

पंतप्रधान म्हणाले, 'मी एका गरीब कुटुंबातील आहे. मी समाज आणि देशाची सेवा करण्यात गुंतलो आहे. मी माझ्या देशासाठी आणि माझ्या देशवासियांसाठी दररोज आणि प्रत्येक क्षणी कठोर परिश्रम केले. माझ्या आईच्या आशीर्वादाने यात खूप मोठी भूमिका बजावली. ज्या आईने मला जन्म दिला त्या आईने मला माझ्या जबाबदाऱ्यांपासून मुक्त केले.'





बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार ०३ सप्टेंबर २०२५

# मराठा-कुणबी आरक्षण प्रश्न : संविधानाच्या चौकटीतील न्याय्य मार्गाचा शोध

जगामध्ये भारत हा विविधतेने नटलेला देश असून भारतामध्ये अनेक जाती आणि जमाती आहेत. त्यापैकीच एक म्हणजे महाराष्ट्रातील मराठा जात होय. महाराष्ट्राच्या सामाजिक, राजकीय आणि आर्थिक इतिहासात मराठा जातीचे स्थान अत्यंत महत्त्वाचे राहिले आहे. शतकानुशतके सत्ता, शेती, लढाई आणि सांस्कृतिक घडामोडींमध्ये मराठा जातीचा मोठा सहभाग राहिला आहे. मराठा जात ही महाराष्ट्राच्या सामाजिक, राजकीय, आर्थिक, सांस्कृतिक तसेच शैक्षणिक परंपरेत मोलाचा वाटा उचलणारी जात आहे. इतिहासाच्या प्रत्येक टप्प्यावर मराठा जातीने आपला ठसा उमटवला आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळापासून ते भारताच्या स्वातंत्र्यलढ्यापर्यंत आणि त्यानंतरच्या राज्यकारभारात मराठा जातीचा सहभाग महत्त्वाचा राहिला आहे. कृषीप्रधान जीवनशैली असलेल्या मराठा जातीने शेतजमिनीशी एकनिष्ठ राहून महाराष्ट्राच्या अन्नधान्य सुरक्षिततेची जबाबदारी उचलली आहे. परंतु, समाजाचा हा मोठा घटक आजच्या घडीला आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक अडचणीत सापडलेला दिसतो. शिक्षण व रोजगाराच्या संधींमध्ये मागे पडलेल्या मराठा जातीसाठी आरक्षण हा अस्तित्वाचा प्रश्न ठरला आहे. विशेषतः महाराष्ट्राच्या ग्रामीण भागातील मराठा जातीतील शेतकरी वर्गाला भेडसावणारे दारिद्य, शिक्षणाचा अभाव, शेतमालाला न मिळणारा योग्य भाव आणि रोजगारातील मर्यादा या समस्यांमुळे आरक्षण हा न्यायाचा मार्ग असल्याची जाणीव निर्माण झाली. म्हणूनच मराठा-कुणबी आरक्षण हा विषय आज महाराष्ट्रातील सर्वांत महत्त्वाचा आणि ज्वलंत सामाजिक-राजकीय प्रश्न बनला आहे.

महाराष्ट्राच्या सामाजिक, राजकीय व आर्थिक क्षेत्रात आरक्षणाचा प्रश्न हा गेल्या काही दशकांपासून सतत चर्चेत असून नेहमीच संवेदनशील राहिला आहे. समाजातील विविध घटकांच्या शैक्षणिक, आर्थिक व प्रशासकीय प्रतिनिधित्वाचा प्रश्न सुटण्यासाठी आरक्षण महत्त्वाची भूमिका बजावत आहे. याच पार्श्वभूमीवर मराठा जातीचे आरक्षण आंदोलन गेल्या दोन दशकांत तीव्र स्वरूपात पुढे आले आहे. तथापि, अलीकडील काळात या प्रश्नाला नवीन वळण मिळाले असून मराठा जातीतील 'कुणबी' ओळख आणि त्यावरून आरक्षणाचा मार्ग मोकळा करण्याचा प्रयत्न यामुळे पुन्हा एकदा महाराष्ट्रातील सामाजिक-राजकीय वातावरण ढवळून निघाले आहे. या वादाकडे पाहताना केवळ भावनिकतेच्या पलीकडे जाऊन संविधानाची मर्यादा, न्यायालयीन निर्णय आणि सामाजिक न्याय या मूलभूत चौकटीतून विचार करणे गरजेचे ठरते.

शिक्षण व नोकरीच्या संधी, सामाजिक समता आणि आर्थिक उन्नती या तिन्ही गोष्टींसाठी आरक्षण हे महत्त्वाचे साधन ठरत आहे. परंतु आरक्षणाचा हा प्रवास सरळसोपा किंवा सहज नाही आहे. अनेकवेळा संघर्ष, आंदोलने, कायदेशीर लढाया आणि न्यायालयीन निर्णय यांचा गुंता या प्रवासात आढळतो. त्यात सर्वाधिक गाजलेला प्रश्न म्हणजे मराठा-कुणबी आरक्षण प्रश्न होय. या वादाचा मागोवा घेतला, तर तो केवळ एका समाजाच्या मागण्यांपुरता मर्यादित राहत नाही, तर तो भारतीय राज्यघटनेतील सामाजिक न्यायाच्या तत्त्वांशी आणि न्यायालयीन मर्यादांशी जोडलेला आहे. त्यामुळे हा विषय अधिक गांभीर्याने पाहण्याची गरज आहे.

मराठा समाजाच्या आरक्षणासाठीची मागणी ही नवी नसून गेली अनेक दशके या संदर्भात चळवळी होत आहेत. सुरुवातीला ही मागणी सामाजिक न्यायाच्या तत्त्वांवर आधारित होती. परंतु, १९९२ मधील सर्वोच्च न्यायालयाच्या इंद्र साहनी प्रकरणातील निकालानुसार, आरक्षणाची मर्यादा ५० टक्क्यांपर्यंतच ठेवण्यात आली. या मर्यादेमुळेच पुढे मराठा समाजाला आरक्षण मिळवून देण्याचा प्रश्न गुंतागुंतीचा ठरला. राज्य सरकारांनी वेळोवेळी कायदे करून किंवा समित्या स्थापन करून आरक्षणाचा मार्ग शोधण्याचा प्रयत्न केला, परंतु न्यायालयीन प्रक्रिया आणि घटनात्मक मर्यादा यामुळे या मागणीवर कायम अनिश्चिततेचे सावट राहिले आहे.

२०१८ मध्ये महाराष्ट्र राज्य सरकारने मराठा समाजाला सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गीय (एसईबीसी) म्हणून मान्यता देत १६ टक्के आरक्षण लागू केले होते. या निर्णयामुळे काही प्रमाणात दिलासा मिळाला असला तरी तो न्यायालयीन पडताळणीत टिकला नाही. सर्वोच्च न्यायालयाने मे २०२१ मध्ये हा कायदा असंवैधानिक ठरवत रद्द केला. न्यायालयाने स्पष्ट केले की ५० टक्क्यांच्या मर्यादेपलीकडे जाण्यासाठी अत्यंत अपवादात्मक आणि ठोस परिस्थिती असणे गरजेचे आहे, जी या प्रकरणात सिद्ध झाली नाही. त्यामुळे आरक्षणाचा प्रश्न पुन्हा एकदा अधांतरी राहिला.

या पार्श्वभूमीवर 'मराठा-कुणबी' आरक्षणाचा मुद्दा समोर आला. महाराष्ट्रातील काही मराठा कुटुंबांचे शैक्षणिक व सामाजिक दस्तऐवज तपासले असता त्यामध्ये कुणबी जातीचा उल्लेख आढळून आला. कुणबी जात इतर मागासवर्गीय (ओबीसी) आरक्षणाच्या वर्गवारीखाली येतो. त्यामुळे मराठा समाजातील ज्यांच्याकडे कुणबी नोंद असलेली कागदपत्रे आहेत, त्यांना ओबीसी आरक्षणाचा लाभ देणे ही एक घटनात्मकदृष्ट्या शक्य बाब मानली जाऊ लागली. हा मार्ग न्यायालयीन कसोटीला उतरू शकतो, कारण तो ५० टक्क्यांच्या आरक्षण मर्यादेला धक्का न लावता, विद्यमान इतर मागासवर्गीय (ओबीसी) आरक्षणाच्या चौकटीत राहून उपाय शोधतो.

तथापि, या प्रक्रियेत अनेक गुंतागुंती आहेत. प्रथम, सर्व मराठा कुटुंबांकडे कुणबी असल्याचे दाखले नाहीत. दुसरे म्हणजे, इतर मागासवर्गीय (ओबीसी) आरक्षण आधीच विविध मागासवर्गीय जातींना उपलब्ध आहे. जर मोठ्या प्रमाणावर मराठा जात या गटात समाविष्ट झाली, तर आधीपासून इतर मागासवर्गीय (ओबीसी) प्रवर्गात असलेल्या जातींना आरक्षणातील संधी कमी होण्याची भीती वाटत आहे. त्यामुळे सामाजिक समतोल बिघडण्याची शक्यता आहे. हाच मुद्दा आज वादाचा केंद्रबिंदू ठरला आहे.

घटनात्मक दृष्टीने आरक्षणाचा प्रश्न हाताळताना न्याय, समता आणि बंधुता या मूलभूत मूल्यांचा विचार केला पाहिजे. संविधानाने अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि इतर मागासवर्गीय (ओबीसी) जातींच्या उन्नतीसाठी विशेष तरतुदी केल्या आहेत. पण त्याच वेळी सर्व समाजघटकांना समान संधी देण्याची जबाबदारी देखील राज्यावर आहे. म्हणूनच मराठा-कुणबी आरक्षणाचा प्रश्न फक्त भावनिक किंवा राजकीय दृष्टिकोनातून नव्हे, तर घटनात्मक आणि शास्त्रीय अभ्यासाच्या आधारावर सोडवला गेला पाहिजे.

या मागणीचा सामाजिक आणि आर्थिक पाया दुर्लक्षित करता येणार नाही. कृषिप्रधान समाज म्हणून मराठा जातीवर आर्थिक ओढाताण वाढली आहे. कमी शेती, शेतीवरील अनिश्चित उत्पन्न, हवामानातील बदल आणि वाढते कर्ज या गोष्टींमुळे ग्रामीण मराठा जातीला उपजीविकेचे साधन शोधणे कठीण झाले आहे. शिक्षण आणि नोकरीच्या स्पर्धेत आर्थिकदृष्ट्या सक्षम पार्श्वभूमी नसल्यामुळे हा समाज मागे पडत आहे. म्हणूनच आरक्षण हा त्यांच्या दृष्टीने जीवनातील संधींमध्ये समता निर्माण करण्याचा मार्ग आहे.

दुसरीकडे, इतर मागासवर्गीय जातींना देखील त्यांचे आरक्षण धोक्यात येईल अशी चिंता आहे. त्यांच्या दृष्टीने हा प्रश्न केवळ संख्येचा नाही, तर ऐतिहासिक अन्यायाची भरपाई करण्याचा आहे. म्हणूनच शासनाने निर्णय घेताना संतुलित दृष्टी ठेवणे गरजेचे आहे. एकीकडे मराठा समाजाच्या न्याय्य मागण्यांना प्रतिसाद देणे आणि दुसरीकडे विद्यमान इतर मागासवर्गीय (ओबीसी) जातींच्या हक्कांवर गदा न आणणे हे शासनासमोरील मोठे आव्हान आहे.

या संदर्भात तज्ज्ञांचे असे मत आहे की मराठा समाजातील ज्यांच्याकडे ठोस पुरावे आहेत त्यांना कुणबी म्हणून इतर मागासवर्गीय (ओबीसी) आरक्षणात समाविष्ट करणे हा घटनात्मक दृष्ट्या योग्य मार्ग ठरू शकतो. मात्र, हा उपाय तात्पुरता न राहता शाश्वत ठरण्यासाठी दस्तऐवजांची अचूक तपासणी, पारदर्शक प्रक्रिया आणि सर्व समाजघटकांचा विश्वास मिळवणे आवश्यक आहे. याशिवाय, केवळ आरक्षणावर भर न देता शिक्षण, कौशल्य विकास, उद्योगधंदे, ग्रामीण भागातील पायाभूत सुविधा आणि शेतमालाच्या बाजारपेठा या क्षेत्रांत ठोस सुधारणा घडवणे तितकेच महत्त्वाचे आहे.

मराठा-कुणबी आरक्षणाचा प्रश्न हा केवळ एका जातीचा प्रश्न नाही, तर महाराष्ट्रातील सामाजिक न्यायाच्या व्यापक प्रक्रियेचा भाग आहे. हा प्रश्न न्यायालयीन, घटनात्मक आणि सामाजिक कसोटीला तोंड देईल अशा पद्धतीने सोडवणे गरजेचे आहे. भावनिक आंदोलने, राजकीय घोषणाबाजी किंवा तात्पुरते कायदे या समस्येचे शाश्वत उत्तर ठरू शकत नाहीत. त्यामुळे समाजशास्त्रीय अभ्यास, घटनात्मक निकष आणि सर्व घटकांच्या सहभागातून संतुलित निर्णय घेणेच योग्य ठरेल.

आज मराठा जात आरक्षणाच्या मागणीसाठी रस्त्यावर उतरत आहे, तर इतर मागासवर्गीय (ओबीसी) जाती आपल्या हक्कांच्या रक्षणासाठी सज्ज आहेत. या संघर्षात सामाजिक ऐक्य धोक्यात येऊ नये हे राज्यकर्त्यांनी सुनिश्चित करणे आवश्यक आहे. कारण आरक्षणाचा मूलभूत हेतू समाजात विभागणी निर्माण करणे नाही, तर दुर्बल घटकांना न्याय देणे आहे. म्हणूनच मराठा-कुणबी आरक्षणाच्या प्रश्नाकडे संविधानाच्या मर्यादेत, तटस्थतेने आणि दूरदृष्टीने पाहणे हीच खरी काळाची गरज आहे.



डॉ. राजेंद्र बगाटे,
(लेखक, सहाय्यक प्राध्यापक असून समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)
मो. 99601 03582

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002